




दैनिक
महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे ऐकमेव निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

VADAL VARTA








vadalvartanews@gmail.com

●मुख्य संपादक : अजय भांगे ●संपादक : रमेश गुळभिले ●कार्यकारी संपादक : संतोष निकम मो.न. ९४२२६६००७७

● बीड/महाराष्ट्र ● बुधवार २८ फेब्रुवारी २०२४ ● आरएनआय/टिसी/एमएएचएमएआर/२०२३/५२३१५ ● वर्ष १ ले ● अंक १९६ ● पाने ४ ● किंमत ४ रुपये


# उपोषणावेळी अनावधानाने:मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्र्यांबद्दल शब्द निघाले असतील तर मी ते शब्द मागे घेतो

## आई बहिणीपेक्षा आम्हाला दुसरं काहीच मोठं नाही. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने चालणारे लोक आहोत. मनोज जरांगे पाटील

वादळवार्ता/

मराठा आरक्षणासाठी लढणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी आंतरवाली सराटी येथे आयोजित पत्रकार परिषदेतून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप केले होते. या आरोपांचे पडसाद राजकीय वर्तुळात उमटले. विरोधकांनी यावरून सत्ताधाऱ्यांवर टीकाही केली. देवेंद्र फडणवीस मला विष देऊन किंवा इतर मार्गांनी मारणार असल्याचा आरोप करत मनोज जरांगे पाटील यांनी फडणवीसांना इशारा दिला की, मीच मुंबईत सागर बंगल्यावर (उपमुख्यमंत्र्यांचं निवासस्थान) येतो. परंतु, आंदोलक आणि समर्थकांनी समजूत काढल्यानंतर मनोज जरांगे यांनी मुंबईला जाण्याऐवजी बेमुदत उपोषण साखळी उपोषणात रुपांतरीत करण्याचा निर्णय जाहीर केला. तसेच, त्यांनी उपचारही घेतले. या सर्व आरोप-प्रत्यारोपांचे आज (२७ फेब्रुवारी) विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पडसाद उमटले. अधिवेशनादरम्यान, सभागृहात मोठा गदारोळ झाल्याचं पाहायला मिळालं. भाजपा आमदार आशिष शेलार यांनी मागणी केल्यानंतर जरांगेंचं आंदोलन आणि त्यांचे आरोप यांची एसआयटी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील आपली भूमिका सभागृहासमोर मांडली आहे. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सभागृहात म्हणाले, "मनोज जरांगेंच्या विषयावर बोलायची माझी इच्छा नव्हती. पण तरी विषय निघालाच आहे तर काही गोष्टी सांगितल्या पाहिजेत असं मला वाटतं. या सभागृहाला आणि महाराष्ट्राला मराठा समाजासाठी मी काय केलंय हे पूर्णपणे माहिती आहे. त्यामुळे मनोज जरांगे पाटील माझ्याबद्दल जे काही बोलले, त्यानंतर मराठा समाज त्यांच्यामागे नव्हे तर माझ्यामागे उभा राहिला आहे. दु:ख या गोष्टीचं आहे की अशाप्रकारे कुणीही कुणाची आई-बहीण काढेल. आपण छत्रपती शिवाजी महाराजांचं नाव सांगतो. कल्याणच्या सुभेदाराच्या सुनेला परत पाठवणारे छत्रपती होते. पण त्यांचं नाव घेऊन लोकांच्या आयाबहिणी काढायच्या?



पण माझी त्यांच्याविषयी तक्रारच नाहीये. त्यांच्यामागे कोण आहे हे शोधावंच लागेल" फडणवीस यांनी थेट विधानसभेतून टीका केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी यावर प्रतिक्रिया दिली आहे. मनोज जरांगे पाटील म्हणाले, आंदोलन चालू असताना असं काहीतरी अनावधानाने होतं. आमचं बेमुदत उपोषण आहे. त्यावेळी ते अनावधानाने झालं असेल. मी कोणालाही आई-बहिणीवरून शिव्या दिल्या नसतील. मी शिव्या दिल्या असतील तर दिलगिरी व्यक्त करतो. देवेंद्र फडणवीस विधानसभेत बोलले की मी आई-बहिणीवरून शिव्या दिल्या. त्यांनी विधानसभेच्या पटलावर ही गोष्ट मांडली असं मी ऐकलं आहे. त्यामुळे मी एवढंच सांगेन की, मी आई-बहिणीवरून बोललो असेन आणि ती गोष्ट फडणवीसांना लागली असेल तर मी त्या शब्दांबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. केवळ ते शब्द मागे घेतो.

### त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. आई बहिणीपेक्षा आम्हाला दुसरं काहीच मोठं नाही'

मनोज जरांगे पाटील म्हणाले, "मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्र्यांबद्दल असे शब्द निघाले असतील तर मी ते शब्द मागे घेतो. त्याबद्दल दिलगिरी व्यक्त करतो. आई बहिणीपेक्षा आम्हाला दुसरं काहीच मोठं नाही. आम्ही छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचाराने चालणारे लोक आहोत. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन निघालो आहोत. त्यामुळे अनावधानाने कोणाच्याही आई-बहिणीवरून तोंडून काही चुकीचे शब्द गेले असतील तर मी १०० टक्के ते शब्द मागे घेतो आणि दिलगिरी व्यक्त करतो." मनोज जरांगे पाटील छत्रपती संभाजीनगर येथे टीव्ही ९ मराठीशी बोलत होते.

# सोलापूर जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघाचे प्रशिक्षण शिबीर संपन्न

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

सोलापूर जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता फेडरेशनच्या वतीने महासंघ सोलापूर दिनांक २५/०२/२०२४ रोजी. मांगल्य स्टोन डेपो कुर्डवाडी ता. माढा येथे माहिती अधिकार प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात सोलापूर जिल्ह्यातील मोठ्या संख्येने माहिती अधिकार कार्यकर्ते उपस्थित होते. मा. श्री. संजय किनीकर स्वामी पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष यांनी प्रशिक्षण शिबिरात माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याबाबत उपस्थित त्यांना चर्चेतून सुंदर असे मार्गदर्शन केले. तसेच या प्रशिक्षणात सोलापूर जिल्हा अध्यक्ष योगेश सुळे यांनी प्रशासन शिबिर आयोजित करण्यामागचा हेतू काय आहे आणि सर्वांना हे प्रशिक्षण का महत्वाचे आहे हे समजून सांगितले. या प्रशिक्षण शिबिरासाठी माढा दक्षिण सोलापूर उत्तर सोलापूर माळशिरस पंढरपूर मंगळवेढा बार्शी इत्यादी तालुक्याचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सर्व नियोजन माढा तालुका अध्यक्ष राजाराम बोराडे यांनी केले कार्यशाळेला उपस्थिती पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष संजय किनीकर स्वामी सोलापूर जिल्हा अध्यक्ष योगेश सुळे, दिपाली स्वामी महिला जिल्हाध्यक्ष , अनिता कलशेट्टी, योगेश सुतार, अनिता बोराडे, कांचन बोराडे, धनश्री बोराडे, भारत गवळी, गजानन घाडगे, हनुमंत कोलगे, समाधान सुतार, शांतिनाथ सुतार, पंडित सुतार, बिभीषण दळवी नवनाथ लोंढे ॲडव्होकेट. रमेश भिले, शौकत अली पठाण,बाळू सुतार, नामदेव सुतार, दिनेश जगदाळे, महेश टोणपे, अजय देवकते,अनिल शिंदे. इत्यादी सभासद व पदाधिकारी उपस्थित होते.



# उरण रेल्वे स्टेशन ते कोटनाका रस्त्यावर पथदिवे लावण्याची त्रस्त नागरिकांची प्रशासनास मागणी.

दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

१२ जानेवारी २०२४ रोजी उरण रेल्वे स्टेशनचे उदघाटन मा.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. त्यामुळे उरणच्या नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. रोज रेल्वे प्रवास करणाऱ्यांमध्ये शालेय विद्यार्थी, महिला, जेष्ठ नागरिक , दिव्यांग यांचा मोठा सहभाग आहे.

परंतू मध्ये उरण रेल्वे स्टेशन ते कोटनाकापर्यंत रोडवर पथदिवे नसल्याने संध्याकाळ नंतर पूर्णतः अंधार पसरला जातो. त्यामुळे शाळा- कॉलेज विध्यार्थी, महिला, दिव्यांग, जेष्ठ नागरिक या सर्वांना समोरून व पाठीमागून येणाऱ्या भरधाव वाहनांमुळे आपला जीव मुठीत घेऊन, अंधारातून पायपीट करावी लागते.

तसेच मुख्यतः अंधारातून पायपीट करत असताना विद्यार्थी, महिला व जेष्ठ नागरीक यांच्या वर अंधाराचा फायदा घेऊन लुटमार, चोरी, छेडछाड असे कोणताही अनुचित प्रकार घडू नये, म्हणून सुरक्षेच्या कारणास्तव उरण रेल्वे स्टेशन ते कोटनाका मुख्यरोड वर लवकरात लवकर ग्रुप-ग्राम पंचायत चाणजे व प्रशासन मार्फत पथदिवे बसविण्याची मागणी त्रस्त रेल्वे प्रवाशी करीत आहेत.




# आमदार संजय गायकवाड वर वन्यजीव संरक्षण १९७२ कायद्या अंतर्गत गुन्हा नोंद करा शिवसेना जिल्हाप्रमुख:- गणेश वरेकर

**वादळवार्ता/बीड**

बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड यांनी एका न्युज चॅनलच्या मुलाखतीत १९८७ साली मी स्वतः वाघाची शिकार केली असुन या वाघाचा दात माझ्या गळ्यात बांधलेला आहे. असा कबुलीजबाब स्वतः त्यांनी दिली आहे. या संदर्भात यांच्या वर तात्काळ गुन्हा दाखल करावा याचे निवेदन शिवसेना जिल्हाप्रमुख यांनी विभागीय वन अधिकारी बीड यांना देण्यात आले. सदरील कबुली ही वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ रोजी महाराष्ट्रात लागु झाला असुन वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ मध्ये वाघांना आय.यु.सी.एन च्य यादीत धोक्यात आलेल्या प्रजातीच्या लाल यादीत संकटग्रस्त म्हणून वर्गीकरण करण्यात आले आहे हा कायदा वाघाची शिकार, वाघाची कातडी, हाडे, शरीराच्या अवयवापासुन संरक्षण करतो. या गुन्ह्यात गुन्हा करताना पहिल्यांदा दोषी ठरल्यास ३ ते ७ वर्षांचा तुरूंगवास ५,००,०००/ ते ५०,००,०००- रुपयांपर्यंत दंड असा कायदा केला आहे. जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या एका जवाबदार आमदाराने शिकार केली व त्याचा दात माझ्या गळ्यात आहे असा कबुलीजबाब दिला असुन त्यांच्यावर तात्काळ वन्यजीव संरक्षण कायदा १९७२ अन्वये तात्काळ गुन्हा नोंद करावा असे विभागीय वनअधिकारी व बीड शहर पोलिस स्टेशनला शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख गणेश वरेकर यांनी सोबत उपजिल्हाप्रमुख राजु महुवाले, हनुमान जगताप, आशिष मस्के तालुकाप्रमुख गोरख सिंघम,रवी वाघमारे, विनोद गुंड पाटील, समाधान हिंगणे, बारीकराव येवले, सय्यद नय्युम, आण्णा गायकवाड, महादेव परस्कर, नसिर पठाण, नितीन नवले, ज्ञानेश्वर काशीद, नारायण ढोकणे, गणेश जाधव, यांच्या सह शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते..

# उरण महाविद्यालयात मराठी राजभाषा दिन संपन्न

दैनिक वादळ वार्ता
उरण/विठ्ठल ममताबादे

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने मराठी राजभाषा दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. कवी श्रेष्ठ कुसुमाग्रज यांचा जयंती दिवस सबंध देशात मराठी राजभाषा दिन म्हणून साजरा केला जातो. महाराष्ट्र गीताने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य के ए श्यामा होते त्यांनी मराठी भाषेतील आद्यग्रंथ ज्ञानेश्वरी हा सर्वांनीच वाचला पाहिजे असे सांगितले. कारण ज्ञानेश्वरी सांगितलेली जीवनमूल्य दिशादर्शक आहेत असे प्रतिपादन केले. व आई आणि बाबा या शब्दांचे महत्त्व विशद केले. कार्यक्रमातील प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. दादाराव मस्के (सुप्रसिद्ध लोककलाकार, घाटकोपर,मुंबई) यांनी महाराष्ट्राच्या लोककलेविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. आंगणीय लोककला आणि प्रांगणीय लोककला, गोंधळ ( जोगवा गीत),तमाशा ( तम-अंधार, आशा-प्रकाश) तमाशाचे प्रकार ( शलमी, ढोलकी, गण, गवळण, रंगबाजी, वग)बतावणी. जागरण, लावणी (पेरणी) पोवाडा इत्यादी विषयी सविस्तर माहिती सांगून या परंपरा आपण जतन केल्या पाहिजे असे सांगितले व आपल्या मधुर आवाजात त्यांनी लावणी, पोवाडा, गोंधळ इत्यादी विद्यार्थ्यांसमोर सादर केला व सर्वांना मंत्रमुग्ध केले. कार्यक्रमाचे आयोजक प्रा. डॉ.पराग कारुलकर (सांस्कृतिक विभाग प्रमुख) पाहुण्यांचा परिचय दिला. यावेळी मराठी भाषा सुंदर हस्ताक्षर स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ.दत्ता हिंगमिरे यांनी केले तर आभार प्रा.डॉ. एच.के. जगताप यांनी व्यक्त केले. कार्यक्रमात आय.क्यु.ए.सी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण, ज्येष्ठ प्रा. व्ही.एस. इंदुलकर, महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




# अखंड हरिनाम सप्ताह व पारायण सोहळ्याचे रोपळे येथे आयोजन

**दैनिक वादळ वार्ता**
**सोलापूर/विश्वास चोपडे**

श्री संत गजानन महाराज शेगाव यांच्या १४६व्या प्रकट दिनानिमित्त त्रिजनी अखंड हरिनाम सप्ताह श्री संत गजानन महाराज मंदिर रोपळे (क) ता. माढा येथे सोळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहात विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे पहाटे ५ ते ६ काकडा सकाळी ७ ते १० श्री गजानन विजय ग्रंथ पारायण सायंकाळी ७ ते १० हरिपाठ रात्री ७:३० ते ९:३० हरीकिर्तन रात्री कीर्तनानंतर दररोज महाप्रसाद रात्री ११:०० ते ४ हरिजागर ह.भ.प. संजय नाना महाराज धोंडगे नाशिक यांचे कीर्तन शुक्रवार दिनांक ०१/०३/२०२४ रोजी सायंकाळी ७:३०ते ९:३० या वेळेत होईल ह.भ.प. उमेश महाराज दशरथे मानवत जिल्हा परभणी यांचे कीर्तन गुरुवार दिनांक ०२/०३/२०२४ रोजी सायंकाळी ७:३०ते ९:३० या वेळेत होईल व ह.भ.प. संजय महाराज पाचपोर रामायणचार्य (अकोला) यांचे काल्याचे किर्तन व महाप्रसाद होईल दिनांक ०३/०३/२०२४ रोजी सकाळी ९:३०ते ११:३० या वेळेत मृदुंग वादक ह.भ.प काजळे महाराज ( मृदंग महामेरू) यांची साथ असेल संयोजक श्री. योगेश पांडुरंग दळवी मुख्याध्यापक श्रीमान लक्ष्मणराव पवार माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालय रोपळे (क) व श्रीपाद पांडुरंग दळवी उपसरपंच रोपळे (क) यांनी नियोजन केले आहे.

श्रींची आरती महाप्रसाद काल्याचे किर्तन व महाप्रसादाने अखंड हरिनाम सप्ताह सांगता समारोप होणार आहे.ग्रामस्थांनी व भाविकांनी या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा ही विनंती नियोजक व आयोजक यांनी केले आहे.



# संपादकीय

## तरुणाईच्या गळ्यातील ताईत निखळला!

(गझल गायक पंकज उधास श्रद्धांजली विशेष.)

प्रसिद्ध गझल गायक पंकज उधास यांचे दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी वयाच्या ७२व्या वर्षी निधन झाले. ते गेल्या अनेक दिवसांपासून आजारी होते. त्यांची मुलगी नायब हिने ही माहिती दिली आहे. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरुजींचा त्यांना श्रद्धांजली अर्पण करणारा हा लेख... संपादक.

गायक पंकज उधास यांना प्रसिद्ध गझल "चिठ्ठी आयी है"मधून ओळख मिळाली होती. पंकज उधास यांची मुलगी नायब हिने तिच्या सोशल मीडिया हँडलवर ही त्यांच्या मृत्युबाबतची पोस्ट शेअर केली आहे. पंकज उधास यांचा जन्म दि.१७ मे १९५१ रोजी गुजरातमधील जेतपूर येथे झाला. तीन भावांमध्ये ते सर्वात लहान होते. त्यांचे कुटुंब राजकोटजवळील चरखाडी नावाच्या गावातील एका कसब्यात राहत होते. त्यांचे आजोबा जमीनदार आणि भावनगर संस्थानाचे दिवाणही होते. त्यांचे वडील केशुभाई उधास हे सरकारी कर्मचारी होते, त्यांना इसराज वाजवण्याची खूप आवड होती. त्यांची आई जितुबेन उधास यांना गाण्याची खूप आवड होती. यामुळेच पंकज उधास आणि त्यांच्या दोन्ही भावांचा संगीताकडे नेहमीच कल होता. पंकजजींनी कधीच विचार केला नव्हता की, ते गाण्यातून आपले करियर करतील. त्या काळात भारत आणि चीनमध्ये युद्ध सुरू होते. यावेळी लता मंगेशकर यांचे "ऐ मेरे वतन के लोगों" हे गाणे रिलीज झाले. पंकजजींना हे गाणे खूप आवडले. त्यांनी हे गाणे कोणाच्याही मदतीशिवाय त्याच ताल आणि सुरात रचले. एके दिवशी शाळेच्या मुख्याध्यापकांना कळाले की, ते गाण्यात चांगले आहेत, त्यानंतर त्यांना शाळेच्या प्रार्थना संघाचे प्रमुख बनवण्यात आले. एकदा माता राणीची चौकी त्यांच्या कॉलनीत बसली होती. रात्री आरती- भजनानंतर तिथे सांस्कृतिक कार्यक्रम व्हायचा. या दिवशी त्यांच्या शाळेतील शिक्षकांनी येऊन त्यांना सांस्कृतिक कार्यक्रमात गाण्याची विनंती केली. त्यांनी ए मेरे वतन के लोगों हे गाणे गायले. त्यांच्या गाण्याने तिथे बसलेल्या प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी आले. त्यांनाही भरभरून दाद मिळाली. श्रोत्यांमधून एक माणूस उभा राहिला आणि त्यांच्यासाठी टाळ्या वाजवून त्यांना ५१ रुपये बक्षीस म्हणून दिले.

पंकज यांचे दोन्ही भाऊ मनहर आणि निर्जल उधास ही संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध नावे आहेत. या घटनेनंतर पालकांना वाटले की, पंकजही आपल्या भावांप्रमाणे संगीत क्षेत्रात अधिक चांगली कामगिरी करू शकतो, त्यानंतर पालकांनी त्यांना राजकोटमधील संगीत अकादमीमध्ये प्रवेश मिळवून दिला. तिथे अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर पंकज अनेक मोठ्या स्टेज शोमध्ये परफॉर्म करायचे. त्यांना आपल्या भावांप्रमाणे बॉलिवूडमध्ये स्थान निर्माण करायचे होते. यासाठी त्यांना तब्बल ४ वर्षे संघर्ष करावा लागला. या काळात त्यांना कोणतेही मोठे काम मिळाले नाही. कामना या चित्रपटातील त्यांच्या एका गाण्याला त्यांनी आवाज दिला, पण तो चित्रपट फ्लॉप झाला, त्यामुळे त्यांना फारशी प्रसिद्धी मिळाली नाही. काम न मिळाल्याने नाराज होऊन त्यांनी परदेशात जाऊन राहण्याचा निर्णय घेतला. ज्या चित्रपटाच्या गाण्याने लोकप्रियता मिळवली, त्या चित्रपटात काम करण्यास नकार दिला होता. गायनाच्या कलेतून पंकज यांना परदेशात खूप प्रसिद्धी मिळाली. यावेळी अभिनेता आणि निर्माते राजेंद्र कुमार यांनी त्यांची गाणी ऐकली आणि ते खूप प्रभावित झाले. पंकज यांनी गाणे आणि चित्रपटासाठी कॅमिओही करावा, अशी त्यांची इच्छा होती. यासाठी त्यांचा सहाय्यक पंकजशी बोलला, मात्र त्यांनी नकार दिला. राजेंद्र कुमार यांनी याचा आणि पंकजच्या वृत्तीचा भाऊ मनहरशी उल्लेख केला. मनहरने पंकजला हे सांगितल्यावर त्याला खूप वाईट वाटले. त्यांनी राजेंद्र कुमारच्या सहाय्यकाला बोलावून बैठक निश्चित केली. या भेटीनंतर त्यांनी नाम चित्रपटात काम केले आणि "चिठ्ठी आयी है आयी है" या गझलला आवाज दिला. ही गझल त्यांच्या कारकिर्दीतील सर्वोत्तम गझलांपैकी एक आहे. ही गझल डेव्हिड धवन यांनी संपादित केली होती. राजेंद्र कुमार आणि राज कपूर खूप चांगले मित्र होते. एके दिवशी त्यांनी राज कपूर यांना त्यांच्या घरी जेवायला बोलावले. रात्रीच्या जेवणानंतर पंकज उधास यांच्या आवाजात त्यांनी "चिठ्ठी आयी है" ही गझल ऐकवली आणि राज कपूर रडले. या गझलमुळे पंकजला खूप प्रसिद्धी मिळेल आणि ही गझल त्यांच्यापेक्षा चांगली कोणीही गाऊ शकत नाही, असे ते म्हणाले. हळूहळू पंकजजी गझल गायनाच्या प्रेमात पडले, त्यासाठी ते उर्दू शिकले. एकदा ते स्टेज परफॉर्मन्स देत होते, जिथे त्यांनी आधीच ४-५ गझल गायल्या होत्या. तरुणाई अगदी त्यांच्या गायनावर फिदा झाली होती. तेवढ्यात एक प्रेक्षक त्यांच्याकडे आला आणि त्याने गझल म्हणायची विनंती केली. पंकज यांना त्याची वागणूक आवडली नाही आणि त्यांनी गाण्यास नकार दिला. यावर तो माणूस इतका संतापला की त्याने पंकजच्या समोर बंदूक दाखवून त्यांना गाण्यास सांगितले. त्या माणसाच्या कृत्याने पंकज इतका घाबरला की त्याच्या विनंतीवरून त्यांनी एक गझल गायली.

मुस्लीम मुलीशी लग्न करण्यास कुटुंबीयांचा कोणताही आक्षेप नव्हता. दि.११ फेब्रुवारी १९८२ रोजी पंकजने फरीदासोबत लग्न केले. दोघेही एका कॉमन फ्रेंडच्या लग्नात भेटले होते. पंकजला फरीदा पहिल्या नजरेतच आवडली होती. त्यावेळी तो ग्रॅज्युएशन करत होता आणि फरीदा एअर होस्टेस होती. दोघांमध्ये आधी मैत्री, नंतर प्रेम झाले. दोघांनाही आता लग्न करायचे होते. पंकजच्या घरच्यांचा या नात्यावर कोणताही आक्षेप नव्हता. जेव्हा फरीदाने तिच्या कुटुंबीयांना या नात्याबद्दल सांगितले तेव्हा त्यांनी हे नाते मान्य केले नाही. त्याला आपल्या मुलीचे लग्न दुसऱ्या धर्मात करायचे नव्हते. फरीदाच्या सांगण्यावरून पंकज तिच्या घरी गेला आणि तिच्या वडिलांसोबतच्या नात्याबद्दल बोलला. फरीदाचे वडील निवृत्त पोलीस अधिकारी होते, त्यामुळे पंकज खूप घाबरला होता, पण त्याने आपल्या बोलण्याने त्यांचे मन जिंकले. फरीदाच्या वडिलांनी त्यांच्या लग्नाला होकार दिला. त्यानंतर दोघांनी लग्न केले. त्यांना नायब आणि रेवा या दोन मुली आहेत.

जगप्रसिद्ध गायक पंकजजी उधास यांचा परवा दि.२६ फेब्रुवारी २०२४ रोजी ब्रीच कँडी रुग्णालयात सकाळी ११ वाजता मृत्यू झाला. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांची प्रकृती ठीक नव्हती. वयाच्या ७२व्या वर्षी त्यांचे निधन झाल्याबाबतची माहिती त्यांच्या कुटुंबीयांकडून देण्यात आली होती. सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांच्या मुलीने ही माहिती दिली होती. बहुसंख्य चाहतावर्ग तरुणाई हमसून हमसून ढसा ढसा रडत आहे आणि सोशल मीडियावर हृदयद्रावक पोस्ट करत आहे, पंकज दा, अलविदा! अलविदा!! अलविदा!!! !! गझल सम्राट पंकजजी उदास यांना हीच भावपूर्ण श्रद्धासुमने !!

_संकलन व सुलेखन -
श्री कृष्णकुमार
आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.

# राष्ट्रीय विज्ञान दिन: वैज्ञानिक वृत्ती वृद्धिंगत!

भारतात दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिवस चंद्रशेखर वेंकट रामन यांच्या सन्मानार्थ साजरा केला जातो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करण्यासाठी आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान व तंत्रज्ञान परिषद आणि विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाच्या अंतर्गत राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. रामन इफेक्टचा शोध लागल्याने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. या शोधाची घोषणा भारतीय शास्त्रज्ञ सर चंद्रशेखर वेंकटरामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी केली होती. या शोधाबद्दल त्यांना १९३० मध्ये नोबेल पारितोषिक देण्यात आले होते. श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजींचा आपल्या ज्ञानात भर घालणारा सदर संकलित लेख... संपादक.

सुप्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ.वसंतराव गोवारीकर सन १९८७ साली भारत सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान खात्याचे सचिव असताना त्यांनी ज्या अनेक योजना सुरू केल्या त्यातील एक योजना म्हणजे देशात विज्ञानाचे वातावरण निर्माण करण्यासाठी दरवर्षी २८ फेब्रुवारीला राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा करणे. डॉ.वसंतराव गोवारीकरांच्या मनात आले की भारतात विज्ञानाचा एकमेव नोबेल पुरस्कार डॉ.सी.व्ही.रामन यांना मिळाला आहे, तर त्यांच्याशी संबंधितच तो दिवस असावा. शिवाय तो त्यांचा जन्म अथवा मृत्युदिन निवडण्यापेक्षा त्यांनी ज्या दिवशी त्यांचा निबंध जगप्रसिद्ध नेचर या विज्ञान मासिकाला पाठवला आणि ज्याला पुढे सन १९३० साली नोबेल पुरस्कार मिळाला ती तारीख का निवडू नये? अखेर जी तारीख निघाली ती २८ फेब्रुवारी ही होय.

डॉ.सी.व्ही. रमन यांचा जन्म तामिळनाडूमधील तिरुचिरापल्ली आणि शिक्षण चेन्नई येथे झाले. त्यांनी कोलकाता विद्यापीठात सन १९१७-१९३३ भौतिकशास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. डॉ.रमन हे काही काळ बंगलोरातही होते, १९४७ साली ते रमन संशोधन संस्थेचे संचालक झाले. त्यांचे दि.६ मे १९०७ रोजी लोकासुंदरी अम्मलबरोबर लग्न झाले होते. त्यांना चंद्रशेखर आणि रेडिओ-खगोलशास्त्रज्ञ राधाकृष्णन हे दोन पुत्र होते. डॉ.रमन हे चंद्रशेखर सुब्रह्मण्यन यांचे काका होते. सन १९८३मध्ये चंद्रशेखर यांना भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक मिळाले. त्यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. हिंदू तमिळ ब्राह्मण पालकांच्या पोटी जन्मलेले रमन हा एक अनमोल मुलगा होता. त्याने सेंट अलॉयसियसच्या अँग्लो-इंडियन हायस्कूलमधून अनुक्रमे ११ आणि १३ वर्षांचे माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण पूर्ण केले. वयाच्या १६ व्या वर्षी प्रेसिडेन्सी कॉलेजमधून भौतिकशास्त्रात सन्मानाने त्यांनी मद्रास विद्यापीठात पदवी परीक्षेत प्रथम क्रमांक पटकावला. पदवीधर विद्यार्थी असताना सन १९०६ साली त्यांचा पहिला संशोधन पेपर प्रकाशित करण्यात आला. पुढच्या वर्षी त्यांनी एमएची पदवी मिळवली. कोलकाता येथील इंडियन फायनान्स सर्व्हिसमध्ये असिस्टंट अकाउंटंट जनरल म्हणून रुजू झाले, तेव्हा ते १९ वर्षांचे होते. तेथे त्यांची इंडियन असोसिएशन फॉर द अप्लाइन्शन ऑफ सायन्स-आयएसएस या भारतातील पहिल्या संशोधन संस्थेशी ओळख झाली, ज्यामुळे त्यांना स्वतंत्र संशोधन करण्याची परवानगी मिळाली आणि ध्वनी आणि ऑप्टिक्समध्ये त्यांनी मोठे योगदान दिले. रमन यांनी आयुष्यभर दगड व अन्य खनिज पदार्थांचे विस्तृत वैयक्तिक संग्रह जमा केला आणि या खनिजांच्या प्रकाश-विकिरणाच्या गुणधर्मांचा अभ्यास केला. यासाठी त्यांना काही साहित्य देशभरातून व विदेशातून भेट म्हणून मिळाले. नमुन्यांचा अभ्यास करण्यासाठी डॉ.सी.व्ही.रमन अनेकदा लहान हाताळण्याएवढा स्पेक्ट्रोस्कोप घेऊन जात असत. ऑक्टोबर १९७०च्या शेवटी रमण त्यांच्या प्रयोगशाळेत कोसळले; त्यांना रुग्णालयात हलविण्यात आले आणि डॉक्टरांनी त्यांना चार दिवस जगण्यासाठी मुदत दिली. ते वाचले आणि काही दिवसांनी त्यांनी रुग्णालयात राहण्यास नकार दिला, कारण त्यांनी त्यांच्या अनुयायांनी वेढलेल्या त्यांच्या संस्थेच्या बागेमध्ये मरणे पसंत केले. रमनच्या मृत्यूच्या दोन दिवस आधी त्यांनी आपल्या एका माजी विद्यार्थ्यास सांगितले, "अकादमीच्या नियतकालिकांना मरण येऊ देऊ नका, ते देशात विज्ञानाच्या गुणवत्तेचे संवेदनशील संकेतक आहेत." ती संध्याकाळ, रमन यांनी आपल्या संस्थेच्या व्यवस्थापन मंडळाशी भेट घेण्यात आणि त्यांच्याबरोबर संस्थेच्या व्यवस्थापनासंबंधी कार्यवाहीबद्दल त्यांच्याशी चर्चा करण्यात घालवली. दि.२१ नोव्हेंबर १९७०च्या रात्रीनंतर रमन यांचा दुसऱ्या दिवशी पहाटे नैसर्गिक कारणांमुळे मृत्यू झाला. सन १९१७मध्ये कलकत्ता विद्यापीठाच्या राजाबाजार विज्ञान महाविद्यालयात आशुतोष मुखर्जी यांनी त्यांना भौतिकशास्त्राचे पहिले पालित प्राध्यापक म्हणून नियुक्त केले. आपल्या पहिल्या युरोप दौऱ्यात भूमध्य समुद्र पाहून त्याला समुद्राच्या निळ्या रंगाचे वर्णन करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांनी १९२६ मध्ये इंडियन जर्नल ऑफ फिजिक्सची स्थापना केली. त्याने आणि कृष्णन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी प्रकाश विखुरल्याची एक अभिनव घटना शोधून काढली, ज्याला त्यांनी "सुधारित विखुरणे" असे संबोधले, पण त्याला रामन परिणाम म्हणून ओळखले जाते. भारत सरकारतर्फे दरवर्षी राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून हा दिवस साजरा केला जातो. रमन सन १९३३ साली बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये पहिले भारतीय संचालक बनले. तेथे त्यांनी त्याच वर्षी इंडियन अकॅडमी ऑफ सायन्सेसची स्थापना केली. त्यांनी सन १९४८ साली रमन रिसर्च इन्स्टिट्यूटची स्थापना केली. तेथे त्यांनी शेवटच्या काळात काम केले. त्यांच्या रमन परिणाम-प्रकाशाचे मॉलिक्युलर स्कॅटरिंग या शोधासाठी ते ओळखले जातात. सन १९३०चे भौतिकशास्त्राचे नोबेल पारितोषिक रमन यांना मिळाले होते.

राष्ट्रीय विज्ञान दिनाचे उद्दिष्ट असे की, लोकांच्या दैनंदिन जीवनात वापरल्या जाणाऱ्या विज्ञानाचे महत्त्व सांगण्यासाठी राष्ट्रीय विज्ञान दिन दरवर्षी साजरा केला जातो. मानवी कल्याणासाठी विज्ञान क्षेत्रात सर्व क्रियाकलाप, प्रयत्न आणि कृत्ये प्रदर्शित करणे. सर्व विषयांवर चर्चा करण्यासाठी आणि विज्ञान क्षेत्रात विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाची अंमलबजावणी करण्यासाठी हे साजरे केले जाते. देशातील वैज्ञानिक विचारांच्या नागरिकांना संधी देणे. लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान लोकप्रिय करण्यासाठी. राष्ट्रीय विज्ञान दिनाचे मूळ उद्दिष्ट विद्यार्थ्यांना विज्ञानाकडे आकर्षित करणे आणि त्यांना प्रेरित करणे आणि विज्ञान आणि वैज्ञानिक कामगिरीबद्दल लोकांना जागृत करणे हा आहे. विज्ञानाशिवाय विकासाचा मार्ग वेगाने पुढे जाऊ शकत नाही. विज्ञान गैरसमज आणि अंधश्रद्धा नष्ट करते. विज्ञान आणि तंत्रज्ञान प्रसिद्ध करण्यासोबतच देशातील नागरिकांना या क्षेत्रात संधी देऊन नवीन उंची गाठणे हा त्याचा मुख्य उद्देश आहे. देशाच्या विकासासाठी वैज्ञानिक विचारांचा प्रसार आवश्यक आहे. राष्ट्रीय विज्ञान दिनासारखे कार्यक्रम वैज्ञानिक वृत्तीचा प्रसार करण्यासाठी निश्चितच उपयुक्त ठरू शकतात. विज्ञानाच्या माध्यमातूनच आपण समाजातील लोकांचे जीवनमान अधिकाधिक सुखी करू शकतो. विज्ञानाच्या फायद्यांबद्दल समाजात जागरूकता निर्माण करणे आणि वैज्ञानिक वृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने राष्ट्रीय विज्ञान दिन साजरा केला जातो. राष्ट्रीय आणि इतर विज्ञान प्रयोगशाळा, विज्ञान अकादमी, शाळा आणि महाविद्यालये आणि प्रशिक्षण संस्था यासारख्या सर्व विज्ञान संस्थांमध्ये या दिवशी विविध वैज्ञानिक उपक्रमांशी संबंधित कार्यक्रम आयोजित केले जातात. महत्त्वाच्या कार्यक्रमांमध्ये भाषणे, निबंध, शास्त्रज्ञांचे लेखन, विज्ञान प्रश्नमंजुषा, विज्ञान प्रदर्शन, परिसंवाद आणि परिसंवाद इत्यादींचा समावेश होतो. विज्ञान क्षेत्रातील विशेष योगदानासाठी राष्ट्रीय आणि इतर पुरस्कारही जाहीर केले जातात. विज्ञानाची लोकप्रियता वाढवण्यासाठी विशेष पुरस्कारही ठेवण्यात आले आहेत. !! राष्ट्रीय विज्ञान दिनाच्या समस्त भारतीय भावाबहिणींना हार्दिक शुभेच्छा !!

**- संकलन व सुलेखन -**
**श्री कृष्णकुमार**
**आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.**
**पोटेगावरोड, गडचिरोली.**
**फक्त मधुभाष- ७७७५०४१०८६.**

# मी मराठी बोलते....

नमस्कार मित्रांनो ओळखल का मला! अहो मी तुमची मातृभाषा मराठी. आज मुद्दाम तुम्हाला भेटायला आले आहे. माझ्या अस्तित्वाबी जाण करुन द्यायला आले आहे. तुम्ही सर्व इंग्रजी शाळेत शिकत आहात, इंग्रजी बोलत आहात हे बघून मला खुप आनंद वाटतो कारण माझ्या सोबत हिंदी, इंग्रजी या माझ्या बहिणींसोबत तुमची चांगली गट्टी जमली आहे. परंतू मला तुम्ही विसरत चालले आहात याची खंत माझ्या मनात आहे. तुम्हाला माहीत आहे माझ्या महाराष्ट्राचे अस्तित्व टिकविण्यासाठी छत्रपती शिवरायांपासून ते संभाजी महराजापर्यंत तसेच अनेक मराठामोळ्या मावळ्यांनी किती कष्ट घेतले कित्येकांनी आपले प्राण पणाला लावून या मातीचे रक्षण केले व मराठी भाषेची तसेच महाराष्ट्राची अस्मिता जपली, पण आज हे सर्व लुप्त होतांना दिसत आहे. आज महाराष्ट्रात राहून तुम्ही सर्व मराठीला विसरत चालले आहात. मराठीत बोलायला कमीपणा वाटतोय. अरे विचार करा जे संस्कार, जो आदर, जो आपलेपणा जेवढा मी तुम्हाला शिकवते तो कुठे आहे. भाषा सोडाल तर संस्कृती सोडाल मोठ्यांचा आदर विसराल, जो गोडवा माझ्या शब्दात आहे तो कुठेही नसणार एकदा का मी रुसले तुम्ही मला सोडल तर तुमच अस्तित्व मिटणार !

मी सर्वाची आहे माझ्यात मी हिंदीला समावून घेतल, इंग्रजीच्या शब्दांना जागा दिली तसेच इतर भाषेतील शब्दांना मी जागा दिली एवढ मोठ मन ठेवून मी चुकी केली का? आज मराठी बोलणाऱ्याला लवकर नोकरी मिळत नाही, काही लोक तर घाबरतांना दिसतात आपण मराठी सोडून दूसरी भाषा बोलू शकत नाही. कारण तुम्ही लोकांनी मराठी ही फक्त नावापूरती राज्यभाषा म्हणून स्विकारली आहे मनापासून नाही. मला पण भिती वाटत आहे कि, भविष्यात माझं अस्तित्व राहणार कि नाही आज काही ठिकाणी माझे तिसरे स्थान आहे. शाळेत मुल मराठीच्या तासातही इतर भाषा वापरतात असे करता करता माझ अस्तित्व मिटणार का? या छत्रपतींच्या महाराष्ट्रातून माझी ओळख संपणार का? माझ्या विद्यार्थी मित्रांनो तुम्हाला सुध्दा या देशाच भविष्य म्हणतात आणि माझ भविष्य तुमच्या हातात आहे. तुम्हाला संस्कार, आदर शिकायचा असेल, महाराष्ट्राची संस्कृती जतन करायची असेल तर भाषा ही महत्त्वाची मी राहील तरच हे महाराष्ट्र राज्य राहील अन्यथा हे सुद्धा इतिहास जमा होईल..... शेवटी एवढच सांगू इच्छिते इतर भाषांसोबत मराठीचा पण मान राखा असे न म्हणता आधी मराठीचा आदर ठेवा त्या सोबत इतर भाषा शिका. चला एवढ बोलून आता पूढे जाते.धन्यवाद!

**गजानन दशरथ पोटे स्कुल ऑफ स्कॉलर्स बिर्ला कॉलनी अकोला**

# महावितरण,महापारेषण व महानिर्मीती कंपनीतील कंत्राटी कामगारांचा ५ मार्च २०२४ पासून बेमुदत काम बंद आंदोलन.

**दैनिक वादळ वार्ता उरण/विठ्ठल ममताबादे**

महावितरण,महापारेषण व महानिर्मीती कंपनीतील कंत्राटी कामगारांनी ५ मार्च २०२४ पासून बेमुदत काम बंद आंदोलन पुकारले आहे.या पार्श्वभूमीवर कामगार आयुक्त कार्यालय महाराष्ट्र राज्य चे कामगार उपायुक्त (औस) संतोष भोसले यांनी तिन्ही कंपनी व वीज कंत्राटी कामगारांच्या संयुक्त कृती समितीची बैठक सोमवार दिनांक २६ फेब्रुवारी २०२४ रोजी कामगार भवन बांद्रा येथे दुपारी २:३० वाजता आयोजित केली होती.

वीज उद्योगातील सर्व कंत्राटी कामगारांना कंत्राटदार विरहित रोजगार दिल्यास प्रशासकीय खर्चात दर वर्षी सुमारे २ अब्ज ३२ कोटी रुपये सरकारच्या तिजोरीत पडू शकतात. या साठी कंत्राटदार विरहित रोजगार द्यावा, पगार वाढ करावी व वयाच्या ६० वर्षा पर्यंत रोजगार द्यावा या व अन्य महत्वपूर्ण प्रलंबित मागण्यांसाठी राज्यभरात ९ फेब्रुवारी पासून राज्यातील सर्व जिल्ह्यात वीज निर्मिती केंद्र व वितरण व पारेषण ऑफिसवर क्रम बद्ध आंदोलन सुरू आहे.




पाचव्या टप्यात २८ व २९ फेब्रुवारी रोजी २ दिवस ४८ तास कामबंद आंदोलन कामगारांनी पुकारले असून ५ मार्च पासून बेमुदत आंदोलन पुकारले आहे, राज्यभरात एकूण २७ संघटनेचे कामगार आंदोलनात उतरले आहेत. काही संघटना नसल्या तरी त्यांच्या कामगारांनी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतल्याचे दिसून आल्याचे राज्य संघटक सचिन मेंगाळे यांनी सांगितले.कोणत्याही अटी न घालता कामगारांनी आपल्या हितार्थ या आंदोलनात उतरावे असे आवाहन ज्येष्ठ नेते नचिकेत मोरे यांनी केले. मिटिंग मध्ये कामगार उपायुक्त संतोष भोसले, महावितरणचे ललित गायकवाड, महापारेषणचे भरत पाटील, तर महानिर्मीतीचे मा.वाजूरकर तसेच सर्व संघटनेचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.इथून पुढे कोणत्याही पतसंस्थेत कंत्राटदारांना वेतन करु देणार नाही सर्व वेतन हे राष्ट्रीयकृत अथवा शेड्युलबँके मध्ये करन्याची नव्याने अट घातली जाईल.

या वेतनखात्याच्या माध्यमातून कामगाराला २० लाखाचा विमा देण्याची तरतूद करण्यात येईल असा प्रस्ताव कंपनीच्या वतीने कामगार आयुक्तांना दिला.मात्र आंदोलनाच्या मुख्य धोरणात्मक मुद्यांवर प्रशासनाने आज कोणताही ठोस निर्णय न दिल्याने कृती समिती हे बेमुदत काम बंद आंदोलन पुढे चालुच ठेवणार आहे असे कृती समिती संघटक सचिन मेंगाळे व निमंत्रक रोशन गोस्वामी यांनी सांगितले आहे. ऊर्जामंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या सुचनाकडे प्रशासकीय अधिकारी दुर्लक्ष करत असल्याची भावना सर्व संघटनांची असून ऊर्जामंत्री कामगार मंत्री, प्रधान सचिव ऊर्जा व प्रधान सचिव कामगार यांनी मिटिंग घेऊन कायम स्वरूपी तोडगा काढावा. राज्यात कंत्राटी कामगारांच्या हितार्थ हरियाणा पॅटर्न चालू करावा अशी अपेक्षा संयुक्त कृती समितीने कामगार उपायुक्त यांच्याकडे व्यक्त केली आहे .

# ७७ लाख रुपये खर्च करून ही जिजामाता उद्यानाला आली अवकळा



वादळवार्ता/माजलगाव

माजलगाव - शहरातील मंगलनाथ कॉलनीत राष्ट्रमाता जिजामाता उद्यानाला काही महिण्यापुर्वी वैशिष्ट्य पुर्ण योजनेतून ७७ लक्ष रुपये खर्च केले होते. परंतु सध्या उद्यानाची परिस्थिति जैसे थे दिसुन येत आहे.सध्या उद्यानातील शौचालयाचे भांडे फुटलेले शोभेचे झाडे जळालेले, सीसीटीव्ही नावालाच, दारुड्याचा,प्रेमी युगुलांचा वावर काही ठिकाणी दारूच्या बाटल्या दिसून आल्या असून ७७ लाख रुपये पाण्यात गेल्याचे दिसुन येत आहे .याचा मंगलनाथ कॉलनीतील नागरिकांना त्रास होत असून यासाठी मंगलनाथ कॉलनीतील नागरिक लोकशाही मार्गाने नगरपरिषद समोर आंदोलन करणार आहेत. शहरातील उच्चभ्रू वस्ती समजली जाणारी मंगलनाथ कॉलनी येथे राष्ट्रमाता जिजामाता उद्यान आहे. उद्यानातील अवस्था हे उद्यान केले तेव्हापासून होती यावर नगरपरिषदने करोडो रुपये खर्च केले परंतु या ठिकाणी एकही बालक किंवा वृद्ध दिसून आले नाहीत. काही महिन्यापूर्वी या उद्यानाच्या देखभाल दुरुस्तीसाठी वैशिष्ट्य पुर्ण योजनेतून ७७ लक्ष रुपये खर्च करण्यात आला. या उद्यानात कंपाउंड वॉलला रंगरंगोटी शौचालय ची रंगरंगोटी व दुरुस्ती करून शोभेची झाडे लावण्यात आली तर एलईडी लाईट सीसीटीव्ही बसवण्यात आली असून या ठिकाणी एवढया मोठया प्रमाणात खर्च करूनही उद्यानाची अवस्था जैसे थे दिसून येत आहे.

काही महिन्यापूर्वीच या ठिकाणची शोभेची झाडे लावण्यात आली होती परंतु याला पाणीच न दिल्यामुळे ती जळून खाक झाली आहेत. फक्त आपण सीसीटीव्हीच्या कैद मध्ये आहोत असे लिहिलेले आहे . कुठल्याच ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरा दिसून येत नाही. शौचालयाचे भांडे फुटलेले आहेत सर्व ठिकाणी शोभेची झाडे जळालेली आहेत व लॉन सर्व जळून गेलेला असून या ठिकाणी कसल्याच प्रकारची सुख सुविधा दिसून येत नाही या ठिकाणी प्रेमी युगुले व दारुड्यांचा या भागात राहणाऱ्या नागरिकांना त्रास होत आहे. या ठिकाणी कायमचा सुरक्षारक्षक देण्यात यावा अशी मागणी मंगलनाथ कॉलनीतील नागरिकांनी केली आहे.

\- - - - - - -

तीन माजी नगरसेवकांचे काम ?

शहरातील मंगलनाथ कॉलनीतील राष्ट्रमाता जिजामाता उद्यानात शोभेची झाडे व लॉन यासह रंग रंगोटीसाठी वैशिष्ट्य पुर्ण योजनेतून ७७ लक्ष रूपये चे अंदाज पत्रक होते परंतु या ठिकाणी ५५ लक्ष रुपये खर्च झालेला आहे. हे काम तिन माजी नगरसेवकांनी केलेले आहे.

\- मारोती गित्ते
अभियंता,नगर परिषद माजलगाव

७७ लक्ष रूपये ची बोगस कामे करणारे ते तिन नगरसेवक कोण?

राष्ट्रमाता जिजाऊ उद्यानात फक्त रंगरंगोटी करून शोभेची झाडे लावत सर्व बोगस कामे करून ७७ लक्ष रुपये घशात घालणारे ते तीन नगरसेवक कोण अशी चर्चा शहरांमध्ये होत असून मंगलनाथ कॉलनीतील नागरिकातुन तीव्र संताप व्यक्त होत आहे. मंगलनाथ कॉलनीतील राष्ट्रमाता जिजाऊ उद्यान, शाहूनगर मधील पत्रकार भवन जवळील उद्यान व आमदार प्रकाश सोळंके यांच्या जुन्या बंगल्यासमोर झालेल्या गार्डन ची चौकशी करून संबंधित गुत्तेदार व अधिकाऱ्यांवर कारवाई करावी या मागणीसाठी पत्रकार संघ जिल्हाधिकारी यांच्या कडे तक्रार करणार.

# विद्यार्थ्यांनी कृतीशील व्हावे-- डॉ हनुमंत सौदागर

## ( क्रांतिवीर आत्माराम बापू पाटील माध्यमिक विद्यालयात दहावी निरोप समारंभ)

**वादळवार्ता/केज**

कष्ट जिद्द आणि प्रयत्न केल्यास यश हमखास मिळते. विद्यार्थ्यांनी कृतिशीलता जपून चांगला माणूस व्हावे असे मत डॉ हनुमंत सौदागर यांनी व्यक्त केले. ते कासारी येथील क्रांतिवीर आत्माराम बापू पाटील माध्यमिक विद्यालयात दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक डब्ल्यू .डी. चोले, प्रमुख मार्गदर्शक डॉ हनुमंत सौदागर हे होते.





यावेळी दहावीच्या वर्गातील विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. शाळेतील आठवणी जागवल्या. पुढे बोलताना सौदागर म्हणाले आई-वडिलांच्या कष्टाची जाणीव ठेवून शिक्षण घेताना अभ्यास करावा. शिक्षकांनी दिलेली ज्ञानाचे शिदोरी कायमस्वरूपी जीवनात उपयोगी ठरत असते. विद्यार्थी गुणवंत झाले की शाळेचे नाव मोठे होत असते. देशसेवा पर्यावरण संवर्धन अशी मुले जपावीत, चांगला नागरिक व्हावे असे मत व्यक्त केले. कार्यक्रमास सहशिक्षक यु एस डोईफोडे, जी जे भांगे, आर एल मुसळे, एम आय पठाण, ए एम जोगदंड ,डी आर डोईफोडे, जी वाय हजारे ,डी व्ही कराड, व्ही बी सोळुंके यांची होती कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थी रोहन डोईफोडे यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शासनाच्या विवीध स्टॉल व्दारे योजनांची माहीती देत मस्साजोग येथे महा शिबीर संपन्न

## जिल्हाधिकारी दिपा मुधोळ-मुंडे यांनी विवीध योजनांचा लाभ घेण्याचे केले आवाहन.

**वादळवार्ता/केज**

राष्ट्रीय सेवा प्राधिकरण, नवीदिल्ली,महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई,जिल्हा विधी सेवा प्राधिकरण,बीड,जिल्हाधिकारी कार्यालय बीड, जिल्हा परिषद,बीड, तालुका विधी सेवा समिती केज व वकील संघ केज यांच्या संयुक्त विद्यमाने मस्साजोग येथे दिनांक २५ फेब्रुवारी २०२४ रोजी रविवारी महाशिबीराचे आयोजन करण्यात आले होते.या महाशिबीराच्या अध्यक्षपदावर श्री.आनंद यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा बीड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण बीड हे होते तर प्रमुख अतिथी श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे,श्रीमती चेतना तिडके अप्पर जिल्हा पोलिस अधिक्षक, बीड,श्री. जी.जी.सोनी सचिव जिल्हा विधी सेवा समिती बीड,श्रीमती संगीतादेवी पाटील उप मुख्यकार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद बीड, जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.कुणाल जाधव,जिल्हा शल्य चिकीत्सक,महीला व बाल कल्याण समिती प्रमुख, उप जिल्हाधिकारी, तहसीलदार श्री.अभिजीत जगताप,सहाय्यक गट विकास अधिकारी श्रीमती सविता शेप,केज वकील संघाचे अध्यक्ष जेष्ठविधीज्ञ श्री.महादेव लाड,तालुका आरोग्य अधिकारी श्री. यु.व्ही.आठवले यांच्या सह केज तालुक्यातील विवीध कार्यालयाचे अधिकारी, महीला बचत गटाचे प्रतिनिधी,वकील संघाचे सदस्य,नागरीक व महीला भगीनी यांची मोठ्या संख्येने उपस्थीती होती. जिल्हा परिषद माध्यमिक शाळा मस्साजोग शाळेच्या विद्यार्थ्यांनी स्वागतगीत सादर केले.मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन महाशिबीराला सुरुवात करण्यात आली. मान्यवरांचे स्वागत शाल,श्रीफळ,रोपटे व बचत गटाने तयारकेलेल्या वस्तु देऊन करण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री.जी.जी. सोनी यांनी केले.आपल्या प्रास्ताविकपर भाषणात त्यांनी महा शिबीर ग्रामीण भागात घेऊन जास्तीत जास्त लाभार्थ्यापर्यंत जाण्याचा हेतु सिद्ध केला. अप्पर जिल्हा पोलिस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके यांनी सायबर क्राईम वर भाष्य करीत आपला ओटीपी कुणालाही शेअर करु नये तसेच फसवणुकझाल्यास त्वरीत तक्रार करावी. लैंगिक छळाच्या घटना वारंवार घडत असुन पुरुष तक्रार करण्यासाठी धजावत नाहीत त्यांनी तक्रार नोंदवावी तसेच लहान मुलांच्या लैंगिक छळाचे प्रकार वाढतअसुन पोलिस विभाग विविध शाळेत जाऊन जनजागृती करत असल्याचे त्यांनी सांगितले.जिल्हाधिकारी श्रीमती दिपा मुधोळ-मुंडे यांनी न्याय विभागाकडुन असे महामेळावे घेणे कौतुकास्पद असुन सर्वसामान्य नागरीकांना याचा लाभ मिळत आहे. उसतोड कामगारांचा जिल्हा आहे ही ओळख आता पुसुन टाकायची आहे.महीला व मुलांनी ऊस तोडायला जाऊ नये त्यामुळे अर्धे आयुष्य ऊसाच्या फडातच जाते आपल्या मुलांचे आयुष्य सुधारण्यासाठी शिक्षण द्यावे असे आवाहन केले. बीड जिल्हा रेशीम उद्योगात अगेसर असुन रेशीम धागा काढण्याचे तीन कारखाने बीड जिल्ह्यात असुन रेशीम धागा बीड जिल्ह्यात तयार केला जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.सध्या परिक्षा चालु असुन कॉपीमुक्त परिक्षाघ्याव्यात अन्यथा कडक कारवाईला सामोरे लागेल असाईशारा त्यांनी दिला आहे. बालविवाह रोखण्यासाठी यंत्रणा सज्ज असुनमुलींनी व पालकांनी आमचा आदर्श घ्यावा असे त्यांनी सांगितले.यावेळी शासनाच्या विवीध विभागांनी आपले माहीती विषयी स्टॉल लावले होते. तसेच महीला बचत गटा तील महीलांनी आपल्या उत्पादनाचेस्टॉल लावले होते. यामहा शिबीरात लाभार्थी व महीला बचत लाभार्थी यांना धनादेशाचे वाटप करण्यात आले. साने गुरुजी निवासी आश्रम शाळा व रामराव आवरगावकर विधी महाविद्यालय बीड यांनी पथनाट्य सादर केले. आभार प्रदर्शन जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश श्री.कुणाल जाधव यांनी केले.राष्ट्रगीताने महा शिबीराची सांगता करण्यात आली.




# बागवेवाडी येथे माघी गणेशोत्सव सोहळा उत्साहात संपन्न...



राजापूर - (प्रमोद तरळ) तालुक्यातील बागवेवाडी येथील हातणकरवाडी तरुण उत्कर्ष मंडळ (रजि) मुंबई आयोजित नवसाला पावणारा बागव्याचा महागणपतीचा माघी गणेशोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा झाला

राजापूर पूर्व भागातील वसलेल्या मौजे बागवेवाडीतील महागणपती मंदिर येथे माघी गणेश जयंती उत्सव मंगळवार दिनांक १३ जानेवारी २०२४ रोजी सत्यनारायणाची महापूजा, महाप्रसाद व हळदीकुंकू. असे भरगच्च कार्यक्रमांचे आयोजित करण्यात आले होते

माघी गणेशोत्सवाचे औचित्य साधून दि.१३ रोजी रात्रौ ९.०० वाजता भव्य रेकॉर्ड डान्स स्पर्धा संपन्न झाली.यामध्ये प्रथम पारितोषिक रुपये ७०००/- श्राव्या पाटणकर (रायपाटण) द्वितीय पारितोषिक रुपये ५०००/-अमित /अजय /विजय सुवार बंधू (पाचल) तृतीय पारितोषिक रुपये ३०००/-रेखा रोडे (बागवेवाडी) मंथन आयरे (येळवण) यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. पंचक्रोशीतील डान्स स्पर्धकांनी आपली नावे नोंदवून कार्यक्रमाची शोभा वाढवली तसेच अनेक मान्यवरांनी महागणपती मंदिराला भेट दिली त्याबद्दल हातणकर वाडी तरुण उत्कर्ष मंडळ (रजि.) यांनी सर्वांचे आभार मानले .

# शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे पदे वाटप

## ऐकनिष्टेने प्रामाणिक काम करा-शिवसेना जिल्हा प्रमुख गणेश वरेकर

**वादळवार्ता /बीड**

शिवसेना मध्यवर्ती कार्यालय सिद्धिविनायक कॉम्प्लेक्स येथे बीड विधानसभा मतदासंघातील रिक्त पदावर शिवसैनिकांची निवड करून नियुक्ती पत्र देण्यात आले जिल्ह्यातील रिक्त पदे लवकर भरण्यात यावी असा पक्ष आदेश आल्यानंतर शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे जिल्हा प्रमुख गणेश वरेकर यांच्या नेतृत्वाखाली नितीन नवले उपतालुका प्रमुख पाली जिल्हा परिषद गट, ज्ञानेश्वर काशीद उप तालुका प्रमुख सांक्षाळ पिंम्री गट, महादेव परस कर उप तालुका प्रमुख जवळा गट, यांची तर अल्प संख्यांकसेलच्या तालुका प्रमुख पदी निवड करण्यात आली असून त्यांना नियुक्ती पत्र देण्यात आले या प्रसंगी बोलताना शिवसेना जिल्हा प्रमुख गणेश वरेकर म्हणाले की शिवसेना पक्षप्रमुख उद्धव बाळासाहेब ठाकरे यांचे हात बळकट करण्यासाठी आपण एकजुटीने काम करावे ऐकनिश्टेने व प्रामाणिक पणाने काम केल्यास पक्ष दखल घेऊन निश्चितच न्याय देतो यावेळी उपजिल्हा प्रमुख राजू भाऊ महूवाले, उपजिल्हा प्रमुख हनुमंत जगताप, उपजिल्हाप्रमुख आशिष मस्के जिल्हा सह संघटक रतन गुजर त युवा सेना युवा जिल्हा अधिकारी गजानन कदम तालुका प्रमुख गोरख शिंगन माजी सरपंच किशोर ढोकणे भरत सोळुंके नारायण ढोकणे नागुराव शींगन दिनकर ढोकणे बाबुराव सोळुंके सचिन शिंदे खायुम शेख पिंटू राऊत अर्जुन लोमटे मिठू नवले संतोष राऊत राम काशीद अप्पा काशीद महादेव भांबरे यांच्या सह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते



दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे एकमेव दैनिक

# वादळ वार्ता

संपादक ; अजय भांगे मो . ९४२२६६००७७

# ऐतिहासिक सोहळा: परळीतून एकवटली राज्यातील ब्रह्मशक्ती; ब्राह्मण ऐक्य परिषदेला अलोट गर्दी

## ब्राह्मण समाजाच्या सर्व मागण्या सोडवण्यासाठी कटीबद्ध -ना. धनंजय मुंडे यांची सरकारच्या वतीने ग्वाही






## ब्राह्मण समाजाचा प्रत्येक संकल्प व मागणीत मी सदैव सोबत – माजी मंत्री पंकजाताई मुंडे

### राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समाज बांधवांचा गौरव

**वादळवार्ता/परळी वैजनाथ**

ब्राह्मण समाजाचे या देशाच्या जडणघडणीत आणि संस्कृती रक्षणामध्ये मोठे योगदान असून ब्राह्मण समाज हा अन्य सर्व समाजांना दिशा देणारा समाज आहे. ब्राह्मण समाजाने ऐक्य परिषदेच्या माध्यमातून ज्या मागण्या मांडल्या. त्या सरकारमधील एक जबाबदार मंत्री म्हणून सरकारच्या वतीने या सर्व मागण्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याची ग्वाही राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली. तर ब्राह्मण समाजाचा प्रत्येक संकल्प व मागण्यांसाठी मी सदैव समाजासोबत आहे अशी ग्वाही माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी दिली. परळीत आयोजित ऐक्य परिषद ऐतिहासिक ठरली. या परिषदेत परळीतून ब्रह्मशक्ती एकवटल्याचे चित्र दिसून आले. या ऐक्य परिषदेला अलोट गर्दी झाली होती.

पंचम ज्योतिर्लिंग क्षेत्र परळी वैजनाथ येथून सकल ब्राह्मण ऐक्याचा 'हुंकार' पुकारण्यात आला. परळी वैजनाथ येथे आज २५ फेब्रुवारीला राज्यस्तरीय ब्राह्मण ऐक्य परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.संपूर्ण दिवस संघटनात्मक व प्रबोधनात्मक भरगच्च कार्यक्रम झाले.प.पू. सुधीरदास महंत (काळाराम मंदिर, नाशिक), धर्मगुरु प.पू.अमृताश्रम स्वामी महाराज, यांचे आशीर्वाचन या परिषदेला लाभले तर राज्याचे कृषीमंत्री ना.धनंजय मुंडे, भाजप राष्ट्रीय सचिव माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते या ऐक्य परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी आमदार नमिता ताई मुंदडा यांची प्रमुख उपस्थिती होती यया ऐक्य परिषदेसाठी संत-महंतांचे आशीर्वच व विविध क्षेत्रातील दिग्गजांनी मार्गदर्शन केले. राज्यातून सकल ब्राह्मण समाज हजारोंच्या संख्येने एकवटला होता. न भूतो न भविष्यती अशी ब्राह्मण समाजाची ही ऐक्य परिषद ठरली. या ऐक्य परिषदेत समाजाच्या वतीने विविध ठराव ही मंजूर करण्यात आले. मान्यवरांच्या उपस्थितीत ध्वजारोहणाने या परिषदेला प्रारंभ झाला. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज प्रभू वैद्यनाथ व भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन करून या परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी प्रास्ताविकपर बीजभाषण परिषदेचे स्वागताध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी यांनी करताना ब्राह्मण समाजासमोरील आजच्या स्थितीतील विविध प्रश्न, समस्या व शासन दरबारी समाजाच्या न्याय मागण्या याबाबतीत मुद्दे उपस्थित केले. या कार्यक्रमात मान्यवरांच्या शुभहस्ते राज्यस्तरीय प्रेरणा पुरस्कार प्रदान करण्यात आले. त्याचबरोबर विविध क्षेत्रात राज्यभरात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा जीवन गौरव, वैद्यनाथ भूषण, ब्रह्मविभूषण, ब्रह्मभूषण, मनस्विनी ब्रह्मश्री व ब्रह्म अर्जुन अशा वर्गवारीत गौरव करण्यात आला.

याप्रसंगी पुढे बोलताना कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे यांनी आपले सविस्तर मनोगत व्यक्त केले. ब्राह्मण सभाज हा अतिशय सुसंस्कृत समाज असून अन्य सर्व समाजाला दिशादर्शक अशा प्रकारची जबाबदारी या समाजाची आहे. ब्राह्मण ऐक्य परिषद या व्यासपीठावरून केवळ ब्राह्मण समाजाच्या हिताचाच नव्हे तर राष्ट्रहिताचा विचार रुजवला जाणार असल्याचा विश्वास आपल्याला वाटतो .आपली जडणघडण ही संपूर्णतः ब्राह्मण समाजातूनच झाली असून ब्राह्मण समाजाशी आपण एकरूप असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. ब्राह्मण समाजाच्या हितासाठी काही मागण्या समाजाच्या व्यासपीठावरून करण्यात आल्या त्या न्याय मागण्या सरकारकडून नक्कीच सोडवल्या जातील. यासाठी मी सरकारच्या वतीने कटिबद्ध असल्याचे ना. धनंजय मुंडे यांनी सांगितले. तर माजी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी अतिशय आत्मीय भावना व्यक्त करत ब्राह्मण समाजात राष्ट्र उन्नतीचे सामर्थ्य असून लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांचा सकल समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठीचा जो विचार आहे तो पुढे घेऊन जात आपण सदैव प्रयत्न करत असतो. ब्राह्मण समाजाने ऐक्यातून उन्नती या सूत्रामधून स्वजनांच्या हिताचा विचार तर केलाच आहे मात्र या सूत्रातून अन्य वंचित, उपेक्षित, दुर्लक्षित अशा सर्व समाज घटकांच्या उन्नतीचाही विचार ब्राह्मण समाज सदैव करत आला असून या ऐक्य परिषदेच्या माध्यमातूनही तोच विचार ब्राह्मण समाज नक्की करेल असा विश्वास आहे. हा राष्ट्र उत्थानासाठी अग्रेसर असणारा समाज असून या समाजाच्या सर्व संकल्प व मागण्यांमध्ये आपण सदैव सोबत असल्याची ग्वाही पंकजाताई मुंडे यांनी दिली.

या कार्यक्रमात भागवताचार्य व प्रसिद्ध वक्ते स्व. वा.ना उत्पात स्मृती प्रेरणा पुरस्कार, राष्ट्रीय कीर्तनकार स्व. भरतबुवा रामदासी स्मृती प्रेरणा पुरस्कार व महाराष्ट्राच्या प्रसिद्ध वक्त्या रणरागिनी स्व. ॲड. अपर्णाताई रामतीर्थकर स्मृती प्रेरणा पुरस्कार अनुक्रमे डॉ. मंजुषाताई कुलकर्णी, दाते पंचांगकर्ते मोहन दाते, सौ. उज्वलाताई गौड -शर्मा यांना प्रदान करण्यात आले या ऐक्य परिषदेत सुशील कुलकर्णी (संपादक, ॲनालायजर) , विवेक देशपांडे (प्रथितयश उद्योजक) ब्राह्मण संघर्षकन्या केतकी चितळे (प्रसिद्ध सिनेअभिनेत्री) पंचांगकर्ते श्री मोहन दाते , डॉ. मंजूषाताई कुलकर्णी (प्रशासकीय अधिकारी, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई,) , उज्वला जितेंद्र शर्मा-गौड (अध्यक्षा- रणरागिणी महिला मंच, पुणे) श्री. सुरेंद्र चतुर्वेदी, उज्जैन (राष्ट्रीय अध्यक्ष ब्राह्मण महासभा) प्रा. महेश पाटील (शिक्षणतज्ञ) ,श्री. भूषण धर्माधिकारी (संचालक- ध्रुव IAS ॲकॅडमी, मुंबई) श्री. विवेक कुंभेजकर (संस्थापक अध्यक्ष ब्रह्म ॲग्रो) ,प्रा. दीपक कासराळकर (प्रसिद्ध व्याख्याते) श्रीपाद कुलकर्णी (संस्थापक अध्यक्ष BBNG) प्रा. डॉ. विजय पाटील (प्रसिद्ध वक्ते मुंबई) यांचे मार्गदर्शन झाले.

परळीतील या ब्राह्मण ऐक्य परिषदेला महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून ब्रह्मवृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. मुंबई, कोकण ,विदर्भ ,उत्तर महाराष्ट्र ,मराठवाड्यासह विविध भागातून ब्राह्मण समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी ब्राह्मण समाजातील राज्य स्तरावरील सर्व संघटनांचे संमेलन करून ब्राह्मण ऐक्याची प्रतिज्ञा सर्वांना देण्यात आली. संपूर्ण दिवसभर प्रबोधनात्मक व संघटनात्मक विषयावर चर्चा झाली. या ऐक्य परिषदेच्या यशस्वीतेसाठी स्वागताध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी यांच्या नेतृत्वाखाली परळीतील सकळ ब्राह्मण समाजाने अथक परिश्रम घेतले.

## ब्राह्मण समाज ऐक्य परिषदेतील ठराव...

१) मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत मंजूर करण्यात आलेले परशुराम आर्थिक विकास महामंडळ तात्काळ कार्यान्वित करुन भरीव आर्थिक निधी द्या..

२) ब्राह्मण समाजाच्या जमिनीवरील अतिक्रमणासाठी व ब्राह्मण समाजातील व्यक्तीचे होणारे सामाजिक विडंबन बाबत विशेष संरक्षण कायदा पास करावा

३) मुलीच्या मोफत शिक्षणाच्या निर्णयाचे स्वागत.. पण मुलांनाही मोफत शिक्षणाची मागणी व उच्च शिक्षण व व्यावसाईक अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती मिळावी

४) ईनामी जमिनी बाबतीत वर्ग ३ व २ मधून १ मध्ये वर्ग करावेत व मालकी हक्कात नाव घ्यावे

५) ब्राह्मण समाजाच्या कुळ कायद्याचे पुनर्वावलोकन व्हावे.

६ ). विनोबाजी भावे यांच्या भूदान चळवळीत जमिनी दान दिलेल्या ज्या पडीक जमिनी तशाच पडून आहेत त्या जमिनी मूळ मालकांना परत करण्यासाठी विशेष कायदा पारित करावा

७). ब्राह्मण पुरोहित वर्गासाठी मानधन योजना सुरू करावी

८). वेद विद्यालयांना अनुदान व कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रम ब्राह्मण समाजातील मुलांसाठी मोफत करावेत

९).ब्राह्मण समाजातील महिलांच्या लघुउद्योग व गृह उद्योगासाठी मायक्रो फायनान्स शून्य टक्के दराने कर्ज योजना मंजूर करावी

१०). स्वातंत्र्यवीर सावरकरांना भारतरत्न पुरस्कार द्यावा.

११).वेद विद्यालयांना अन्य शाळांप्रमाणे शासकीय अनुदान मंजूर करून कर्मचारी भरती करण्यास मंजुरी द्यावी

# अमृतकाल पर्वामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांचे विचार प्रेरणादायी – राम कुलकर्णी

**दैनिक वादळ वार्ता**

माजलगाव/ प्रतिनिधी दिनांक २७/०२/२०२४ सध्याच्या अमृतकाल पर्वामध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे विचार प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे केंद्रीय कार्यकारणी सदस्य राम कुलकर्णी यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय आय.क्यु.ए.सी. विभाग आयोजित स्वातंत्रवीर सावरकर आत्मार्पण दिनाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह एडवोकेट विश्वास जोशी तसेच मंचावर केंद्रीय कार्यकारिणी सदस्य रविकुमार पेशकार, प्रा. सतीश कुलकर्णी, खोलेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी, सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे, डॉ.विनायक देशमुख यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना राम कुलकर्णी म्हणाले की सध्या भारतभर सोहर्द व सौजन्याचे वातावरण समाजामध्ये राम मंदिराच्या निर्मितीमुळे झाले आहे. अशा काळामध्ये स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचे विचार देखील आपण अंगीकारले पाहिजेत. त्यांच्या विचाराचा वारसा यापुढे आपण चालवला पाहिजे. समाजामध्ये जे काही बदल होत आहेत त्या बदलास आपण सामोरे जाऊन सावरकरांचा विचार मूलभूत मानून समाज विकासासाठी आपण निरंतर झटत राहिले पाहिजे. त्यांच्या विचारांचे अनुयायी जर आपण बनलो तर आपला समाज प्रगत झाल्याशिवाय राहणार नाही.




याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी आपले विचार व्यक्त केले व स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आत्मार्पण दिनप्रसंगी त्यांचे विचारा किती महत्त्वाचे आहेत ते समजावून सांगितले.

प्रसंगी खोलेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मुकुंद देवर्षी यांनी आपले विचार व्यक्त केले व सावरकरांच्या आपल्या विचारातून कृतज्ञता व्यक्त केली.

अध्यक्षीय समारोप करताना स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह एडवोकेट विश्वास जोशी म्हणाले की स्वातंत्रवीर विनायक दामोदर सावरकर यांचे कार्य हे अनमोल व अद्वितीय असे आहे. त्यांच्या विचाराचे पाईक होण्याचे भाग्य आपणास लाभले आहे हे आपल्या संस्थेचेही मोठे भाग्य आहे.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. युवराज मुळये यांनी केले तर आभार उपप्राचार्य प्रा.संतोष लिंबकर यांनी मानले. या कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

# भारतरत्न नानाजी देशमुख ग्राम विकासाचे प्रणेते – प्राचार्य डॉ. सुहास मोराळे

**दैनिक वादळ वार्ता**

माजलगाव/प्रतिनिधी भारतरत्न नानाजी देशमुख हे ग्रामीण विकासाचे प्रणेते होते असे प्रतिपादन श्री सिद्धेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुहास मोराळे यांनी केले. श्री सिद्धेश्वर महाविद्यालय माजलगाव शिक्षक-पालक योजना विभाग आयोजित भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या जयंती प्रसंगीच्या कार्यक्रमात ते बोलत होते.




पुढे बोलताना ते म्हणाले की नानाजी देशमुख भारतासह जगभरात त्यांच्या सामाजिक राजकीय कार्यामुळे निष्णात व आदर्शवत कर्मयोगी म्हणून प्रसिद्ध आहेत. ते प्रखर राष्ट्रभक्त, आदर्श राष्ट्रप्रमुख, विनम्रता, सेवावृत्ती व त्यागमूर्ती यांचे उत्कट मिलाप असणारे व्यक्तिमत्व होते. समाज सुधारक म्हणूनही नानाजी देशमुख यांची ओळख आहे. ग्रामविकासाचे प्रणेते म्हणून त्यांनी कृषी, ग्रामोद्योग, सार्वजनिक आरोग्य, ग्रामीण अर्थव्यवस्था इत्यादी कामात रचनात्मक असे योगदान दिले आहे. जल, जंगल जमीन, शिक्षण व लोकजीवन ही नानाजींच्या कार्याची बलस्थाने राहिलेली आहेत. समाजाच्या व ग्रामीण भागाच्या सर्वत्रिक विकासासाठी भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या विचारांची सद्यस्थितीत गरज असल्याचे प्रतिपादन ही त्यांनी याप्रसंगी केले. या कार्यक्रमास उपप्राचार्य डॉ. गजानन होन्ना, डॉ. युवराज मुळये, प्रा. संतोष लिंबकर कार्यालय अधीक्षक श्री. उत्तरेश्वर आनेवार व महाविद्यालयातील प्राध्यापक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक वादळ वार्ता हे पत्र मुद्रक ग्राफिक्स डी. टी. पी.डिजाईनर अंगद दराडे मो.8668682620 घळाटवाडी माजलगाव बीड 431131 जय श्री राम प्रेस येथून डिजिटल छापून संपादक तथा मालक वितरक अजय भांगे मो. 94226 60077 केज येथून त्यांच्या ऑफिस वरुन बीड तसेच सर्वत्र महाराष्ट्र भर डिजिटल स्वरुपात प्रकाशित केले आहे ( वाद केज / बीड न्यायालय अंतर्गत )